# मुख्याधिकारी नगर पंचायत, एटापल्ली यांचेकडून
# जाहीर प्रसिद्धीकरण

राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समायोजित लोकसेवा देण्याकरिता, तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र लोक सेवा हक्क अध्यादेश दिनांक 28/04/2015 रोजी लागू करण्यात आला आहे. सदर अध्यादेश निर्गमित करण्यामागे सार्वजनिक प्राधिकारणाने पूर्वी असलेल्या सेवा अधिनियमांतर्गत अधिसूचित करून त्याप्रमाणे संबंधित सेवा पुरविणे आवश्यक आहे. त्यामध्ये नगरपंचायत या नागरी स्थानिक संस्थांचा समावेश आहे. नागरी संस्थामार्फत देण्यात येणाऱ्या विविध सेवा सुविधांपैकी नागरिक केंद्रबिंदू मानून, नागरिकांना दैनंदिन जीवनामध्ये सातत्याने आवश्यक असणाऱ्या व ज्या लोकसेवाचा जास्तीत जास्त फायदा घेतला आहे व ज्या सेवा महत्त्वाच्या आहेत, अशा अध्यादेशाच्या कलम 3(अ) नुसार अधिसूचित करण्याबाबत महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एमसीओ-2015/प्र.क्र.189/नवि-14, दिनांक 23/06/2015 नुसार मा. शासन निर्णय घेतला आहे.

मा. शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार एकूण 70 सेवा स्थानिक प्राधिकरणानी अध्यादेशाचे कलम 3(अ) नुसार अधिसूचित करावयाच्या आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश 2015 कलम 3 अन्वये अधिसूचित करावयाच्या एकूण 70 सेवांपैकी नगर पंचायत कार्यालय एटापल्ली देत असलेल्या 67 लोकसेवांची सूची, आवश्यक कागदपत्र, फी, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी यांची यादी विवरणपत्र 01 अन्वये राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**स्वा/-**
**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, एटापल्ली**